# ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याबद्दल ग्रंथालय वापरकर्त्यांचा दृष्टिकोन : एक अध्ययन

**डॉ. स्मिता गिरी**
ग्रंथपाल
महिला महाविद्यालय, नागपूर

---

**प्रस्तावना :**

ग्रंथालय म्हणजे ज्ञानसाधनेच्या खजिना, परंतु या खजिन्यात कोणकोणती ज्ञानसाधने आहेत हे समजण्यासाठी त्याविषयी माहिती देणारे साधन असणे आवश्यक आहे. ते साधन म्हणजे ग्रंथालय तालिका (कॅटलॉग). तालिकेला ग्रंथालयाची किल्ली असेही म्हणतात.ग्रंथालय कॅटलॉग हे ग्रंथालयाच्या संदर्भ सेवा, पुस्तक निवड, वर्गीकरण, कॅटलॉगिंग आणि प्रसार क्रियाकलाप प्रदान करण्यासाठी एक अपरिहार्य साधन आहे.

**तालिकेची व्याख्या :**

एखादा एखाद्या विशिष्ट ग्रंथालयातील वाचन साहित्यची विशिष्ट तालिका नियमावलीनुसार केलेली यादी म्हणजे तालिका.

चार्ल्स अम्मी कटर यांनी त्यांच्या 'रूल्स फॉर अ डिक्शनरी कॅटलॉग' या पुस्तकात ग्रंथालय कॅटलॉगची व्याख्या एका निश्चित योजनेनुसार मांडलेल्या पुस्तकांची यादी अशी केली आहे.

डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या मते, कॅटलॉग अशा प्रकारे तयार केला पाहिजे की प्रत्येक वाचकाला इच्छित पुस्तक मिळू शकेल, प्रत्येक पुस्तक योग्य वाचकापर्यंत पोहोचेल, वाचकाचा वेळ वाया जाणार नाही आणि कर्मचाऱ्यांचा वेळ वाया जाणार नाही अश्या उद्दिष्टांची पूर्ती करणारे असेल .

कोणत्याही ग्रंथालयासाठी कॅटलॉगिंग हे एक महत्त्वाचे आणि अतिशय उपयुक्त साधन आहे, ज्याद्वारे वापरकर्ते ग्रंथालयात संग्रह केलेल्या वाचन साहित्याबद्दल आणि शेल्फमधील व्यवस्थेबद्दल माहिती मिळवू शकतात.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

- ग्रंथालयामार्फत ग्रंथालय कॅटलॉग ची सुविधा देण्यात येते व ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याबद्दल प्रशिक्षण देण्यात येते विद्यार्थ्यांना याची जाणीव आहे का हे जाणून घेणे.
- ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याचा विद्यार्थ्यांचा उद्देश्य जाणून घेणे.
- ग्रंथालय ऑनलाइन कॅटलॉग वापरतांना विद्यार्थ्यांना काही अडचणी येतात का हे जाणून घेणे


**संशोधन पद्धती :**

अभ्यासाकरिता महिला महाविद्यालय नागपूर येथे सत्र 2024-25 मध्ये पदव्युत्तर विभागात प्रवेशित विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली होती.पदव्युत्तर विभागात प्रवेशित एकूण 79 विद्यार्थिनींना प्रश्नावली देण्यात आलेली होती. त्यापैकी एकूण 52 विद्यार्थ्यांनी माहिती भरून दिली. प्रस्तुत अभ्यासात विद्यार्थिनींच्या ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याच्या सवयीशी संबंधित विविध पैलूंचा अभ्यास करण्याच्या प्रयत्न करण्यात आलेला आहे. सर्वेक्षण करण्यासाठी गुगलफॉर्म च्या सहाय्याने 10 प्रश्नांची (प्रामुख्याने वस्तुनिष्ठ शैलीचे प्रश्न) प्रश्नावली तयार करून माहिती संकलित करण्यात आलेली होती. संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. अभ्यासाचे विश्लेषण खाली नमूद केलेले आहे :

**तक्ता क्रमांक 1 : सहभागी विद्यार्थ्यांचे वर्गानुसार विश्लेषण**

| वर्ग | सहभागी विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| एम ए भाग 1 | 33 | 63.5 |
| एम ए भाग 2 | 19 | 36.5 |

आलेख क्रमांक 1:





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 1 दर्शविते की अभ्यासात सहभाग घेतलेल्या व एकूण 52 महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपैकी 33 विद्यार्थी एम ए भाग 1 (36.5%) एम ए भाग 2 (63.5%) चे होते.

**तक्ता क्रमांक 2 : ग्रंथालय कॅटलॉग सेवेची जाणीव बाबत**

| ग्रंथालय कॅटलॉग सेवेची जाणीव बाबत | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| होय | 52 | 100 |
| नाही | 00 | 00 |

आलेख क्रमांक 2 :

1. ग्रंथालयतर्फे ग्रंथालय कॅटलॉग सेवा देण्यात येते याची तुम्हाला जाणीव आहे का?
52 responses





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 2 दर्शविते की अभ्यासात सहभाग घेतलेल्या (100%) विद्यार्थ्यांना ग्रंथालयतर्फे ग्रंथालय कॅटलॉग सेवा देण्यात येते याची जाणीव होती.

**तक्ता क्रमांक 3 : ग्रंथालय कॅटलॉग सेवेची माहिती प्राप्त होण्याबाबत**

| ग्रंथालय कॅटलॉग सेवेची माहिती प्राप्त होण्याबाबत | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| ग्रंथालय ओरिएंटेशन प्रोग्राममार्फत | 37 | 71.2 |
| ग्रंथालय कर्मचाऱ्यांमार्फत | 15 | 28.8 |
| वर्गमित्र /सहकार्यांमार्फत | 00 | 00 |
| इतर | 00 | 00 |

आलेख क्रमांक 3.

2. ग्रंथालय कॅटलॉग सेवा बद्दल तुम्हाला माहिती कशी प्राप्त झाली?
52 responses




वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 3 दर्शविते की 37 (71.2%) विद्यार्थ्यांना ग्रंथालयातर्फे ग्रंथालय कॅटलॉग सेवा देण्यात येते याची माहिती ग्रंथालय ओरिएंटेशन प्रोग्राममार्फत प्राप्त झाली तर 15(28.8%) विद्यार्थ्यांना ग्रंथालय कर्मचाऱ्यांमार्फत माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्रमांक 4 : ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याकरीता देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाच्या जाणीव बाबत**

| ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याकरीता देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाच्या जाणीव बाबत | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| होय | 52 | 100 |
| नाही | 00 | 00 |

आलेख क्रमांक 4 :





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 4 दर्शविते की सहभाग घेतलेल्या (100%) विद्यार्थ्यांना ग्रंथालयतर्फे ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याबाबत प्रशिक्षण देण्यात येते याची जाणीव होती.

**तक्ता क्रमांक 5 ग्रंथालय कॅटलॉगचा वापर करणारे विद्यार्थी**

| ग्रंथालय कॅटलॉगचा वापर करणारे विद्यार्थी | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| होय | 52 | 100 |
| नाही | 00 | 00 |

आलेख क्रमांक 5 :





ग्रंथालयातील पुस्तके जर्नल्स आणि इतर साहित्य या सारख्या संसाधनांचा संग्रह शोधण्यासाठी ग्रंथालयातर्फे M-OPAC सेवा देण्यात येते. वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 5 दर्शविते की सहभाग घेतलेले (100%) विद्यार्थी ग्रंथालयातर्फे देण्यात येणाऱ्या M-OPAC सुविधेचा वापर करतात.

**तक्ता क्रमांक 6 : ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याचे उद्देश्य**

| ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याचे उद्देश्य | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| पुस्तक शोधण्यासाठी | 52 | 100 |
| जर्नल्स शोधण्यासाठी | 13 | 25 |
| विशिष्ट लेखकांचे वाचन साहित्य शोधण्यासाठी | 40 | 76.9 |

**आलेख क्रमांक 6 :**




वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 6 दर्शविते की सहभागी झालेले सर्व विद्यार्थी ग्रंथालय कॅटलॉगचा वापर पुस्तक शोधण्यासाठी तर करतातच पण त्यापैकी 40(76.9%)विद्यार्थी विशिष्ट लेखकांचे वाचन साहित्य शोधण्यासाठी सुद्धा ग्रंथालय कॅटलॉगचा वापर करतात व तसेच 13(25%)विद्यार्थी ग्रंथालय कॅटलॉगचा वापर जर्नल्स शोधण्यासाठी सुद्धा करतात.

**तक्ता क्रमांक 7 : ग्रंथालय कॅटलॉग वापरण्यात येणाऱ्या अडचणी बाबत**

| ग्रंथालय कॅटलॉग वापरण्यात येणाऱ्या अडचणी बाबत | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| होय | 52 | 100 |
| नाही | 00 | 00 |

**आलेख क्रमांक 7 :**




विद्यार्थ्यांना ग्रंथालयातर्फे ऑनलाइन ग्रंथालय कॅटलॉगचा वापर करण्याबाबत प्रशिक्षण देण्यात येते.वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 7 दर्शविते की ऑनलाइन ग्रंथालय कॅटलॉगचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांना कॅटलॉगचा वापर करतेवेळी काहीच अडचणी येत नाही.

**तक्ता क्रमांक 8 : ऑनलाइन कॅटलॉगच्या वापराकरिता वापरणाऱ्या उपकरणाबाबत**

| ऑनलाइन कॅटलॉगच्या वापराकरिता वापरणाऱ्या उपकरणाबाबत | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| मोबाइल फोन | 52 | 100 |
| ग्रंथालय संगणक | 00 | 00 |
| वैयक्तिक संगणक | 00 | 00 |

आलेख क्रमांक 8 :

7.ऑनलाइन कॅटलॉगच्या वापराकरिता तुम्ही कोणते उपकरण वापरतात?

52 responses




वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 8 दर्शविते की सहभाग घेतलेले सर्व (100%) विद्यार्थी ऑनलाइन कॅटलॉग द्वारे ग्रंथालय संग्रह शोधण्याकरिता मोबाईल फोन चा वापर करतात.


**तक्ता क्रमांक 9 : कॅटलॉगमध्ये माहिती शोधण्याबाबत**

| कॅटलॉगमध्ये माहिती शोधण्याबाबत | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| खूप सोपे | 52 | 100 |
| खूप कठीण | 00 | 00 |
| कोणतेही मत नाही | 00 | 00 |

**आलेख क्रमांक 9 :**

8.कॅटलॉगमध्ये माहिती शोधणे किती सोपे किंवा कठीण आहे ?

52 responses





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 9 दर्शविते की सहभाग घेतलेल्या (100%) विद्यार्थ्यांना ऑनलाइन कॅटलॉगमध्ये माहिती शोधणे खूप सोपे वाटते.

**तक्ता क्रमांक 10 : ग्रंथालय कॅटलॉगच्या उपयुक्ततेबाबत**

| ग्रंथालय कॅटलॉगच्या उपयुक्ततेबाबत | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| होय | 52 | 100 |
| नाही | 00 | 00 |

**आलेख क्रमांक 10 :**





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 10 दर्शविते की सहभाग घेतलेल्या (100%) विद्यार्थ्यांना ग्रंथालय कॅटलॉग फायदेशीर वाटते.

**तक्ता क्रमांक 11 : ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या ग्रंथालय कॅटलॉग सेवेबाबत संतुष्टता**

| ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या ग्रंथालय कॅटलॉग सेवेच्या संतुष्टता बाबत | विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| खूप समाधानी | 05 | 9.6 |
| समाधानी | 47 | 90.4 |

**आलेख क्रमांक 11 :**

10.ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याचा तुमच्या अनुभवावर तुम्ही समाधानी आहेत का ?
52 responses




वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 11 दर्शविते की ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या ग्रंथालय कॅटलॉग सेवेच्या संतुष्टतेबाबत प्रश्न विचारले असतांना 47(90.4%) विद्यार्थ्यांनी ग्रंथालय कॅटलॉगचा वापर करतांना समाधानी आहेत असे मत व्यक्त केले. तर 5(9.6%)विद्यार्थ्यांनी ग्रंथालय कॅटलॉगचा वापर करतांना खूप समाधानी आहेत असे आपले मत व्यक्त केले.

**अभ्यासाचे निष्कर्ष :**

विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याच्या सवयीशी संबंधित विविध पैलूंचा अभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांची मते जाणून घेण्यासाठी 10 प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आलेली होती. पदव्युत्तर विभागात प्रवेशित एकूण 52 विद्यार्थ्यांनी सर्वेक्षणात सहभाग घेतला.

सर्वेक्षणातील तथ्य आणि निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत :

1. प्रस्तुत अभ्यासात सहभागी झालेल्या 52 विद्यार्थ्यांपैकी 33 एम ए भाग 1 तर 19 विद्यार्थी एम ए भाग 2 चे होते.
2. अभ्यासातून स्पष्ट होते कि सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयतर्फे ग्रंथालय कॅटलॉग सेवा देण्यात येते याची जाणीव होती.
3. अभ्यासात सहभाग घेतलेल्या 71.2% विद्यार्थ्यांना ग्रंथालय कॅटलॉग सेवेबाबत माहिती ग्रंथालय ओरिएंटेशन प्रोग्राममार्फत प्राप्त झाली तर 28.8% विद्यार्थ्यांना ग्रंथालय कर्मचाऱ्यांमार्फत माहिती प्राप्त झाली.
4. सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयतर्फे ग्रंथालय कॅटलॉग वापरण्याबाबत प्रशिक्षण देण्यात येते याची जाणीव होती.
5. अभ्यासात सहभागी विद्यार्थी ग्रंथालयातर्फे देण्यात येणाऱ्या M-OPAC सुविधेचा वापर करतात.
6. सहभागी झालेले विद्यार्थी ग्रंथालय कॅटलॉगचा वापर पुस्तक शोधण्यासाठी तर करतातच पण त्यापैकी 76.9% विद्यार्थी विशिष्ट लेखकांचे वाचन साहित्य शोधण्यासाठी सुद्धा ग्रंथालय कॅटलॉगचा वापर करतात व तसेच 25% विद्यार्थी ग्रंथालय कॅटलॉगचा वापर जर्नल्स शोधण्यासाठी सुद्धा करतात.

**7.** अभ्यासातून स्पष्ट होते कि अभ्यासात सहभागी विद्यार्थ्यांना ऑनलाइन कॅटलॉगचा वापर करतेवेळी काहीच अडचणी येत नाही.

8. अभ्यासात सहभाग घेतलेले सर्व विद्यार्थी ऑनलाइन कॅटलॉग द्वारे ग्रंथालय संग्रह शोधण्याकरिता मोबाईल फोन चा वापर करतात व विद्यार्थ्यांना ऑनलाइन कॅटलॉगमध्ये माहिती शोधणे खूप सोपे वाटते तसेच विद्यार्थ्यांना ग्रंथालय कॅटलॉग फायदेशीर वाटते.

9. अभ्यासातून असे दिसून आले की ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या कॅटलॉग सेवेबाबत 90.4% विद्यार्थी समाधानी आहेत तर 9.6% विद्यार्थी खूप समाधानी आहेत.

**संदर्भ :**


- लेले, वसंत, आधुनिक ग्रंथालयातील तालिकीकरण ,युनिव्हर्सल प्रकाशन पुणे, १९९७.
- महाजन शांताराम, तालिकीकरण : तात्त्विक , पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, १९९९.
- लाल , सी ,कुमार, के ग्रंथालय एवं सूचना विज्ञान अध्ययन माला,Ess Ess Publication New Delhi 2004.
- Dhiman, Anil & Yashoda Rani, Library Cataloguing Ess Ess Publication New Delhi 2005.